# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली  **P.S.(ठाणे):** जत
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0112  **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**25/02/2026 22:31

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन  **Date From (दिंनाक पासून):** 24/02/2026
**Time Period (कालावधी):**  **Date To ( दिंनाक पर्यंत):** 25/02/2026
**Time From (वेळेपासून):** 15:38 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 09:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 25/02/2026  **Time (वेळ):** 22:03 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 035
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 25/02/2026 22:03 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** विस्तार अधिकारी निवासस्थान , पंचायत समिती जत आवारात,ता जत

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): योगेश रमेश चव्हाण

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (युं.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, अन्टी करप्शन ,सांगली शहर,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, अन्टी करप्शन ,सांगली शहर,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8108601919

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय भगवान सुतार | | | 1. रा शिवशकर थिएटरजवळ, मिरज, ,तामिरज ,जत,सांगली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

वर्दी जबाब दि. 25.02.2026

मी श्री. योगेश रमेश चव्हाण, वय - 38 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.न. 8108601919

सरकारतर्फे फिर्यादी होवून देतो फिर्यादी जबाब की, मी पोलीस निरीक्षक या पदावर अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि: 24/02/2026 रोजी मी कार्यालयात हजर असताना पोलीस उपअधीक्षक श्रीमती यास्मीन इनामदार यांनी आम्हास त्यांचे कक्षामधून बोलावून घेवून तक्रारदार श्री. महिबुब बाबासो सय्यद, रा.धावडवाडी, ता.जत जि.सांगली यांनी फोनव्दारे संपर्क करून त्यांची श्री. सुतार, कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती जत यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळवली असलेचे सांगून तक्रारदार यांना आम्ही पथकासह जत येथे येत असलेचे कळवून संपर्क करीत असल्याचे सुचना दिल्या असल्याचे सांगितले. तसेच इनामदार मॅडम यांनी मला तक्रारदार यांची तक्रार ऐकुन पुढील कारवाई करणेच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी लागलीच मा. आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांना पत्रव्यवहार करून वर्ग-2 चे एक व वर्ग-3 चे एक असे दोन पुरुष कर्मचारी यांची पंच सेवा इकडील कार्यालयात पाठवण्याबाबत विनंती करून पंच साक्षीदार यांचे मोबाईल क्रमांक प्राप्त करून त्यांना तात्काळ एसीबी कार्यालय येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच 11.30 वा चे सुमारास एसीबी कार्यालय येथे आमचे समक्ष हजर झाले. त्यानंतर मी दोन्ही पंचांना एक लोकसेवक यांचेविरूध्द लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करुन लाचलुचपतीचा सापळा लावावयाचा आहे, त्याकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का, असे विचारता, दोन्ही पंचानी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, श्रीमती यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक, दोन्ही पंच, पोना/प्रितम चौगुले, पोकॉ/अजित पाटील व चालक रजपूत असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अॅथ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं. एमएच-10-डीक्यु-9530 मधून कार्यालयातून 11.45 वाजता रवाना होवून स्टेशन चौक, माधवनगर, बुधगाव, कुमठेफाटा मार्गे, शिरढोण, सोलापूर हायवे मार्गे, नागज, जत येथे शासकीय बंद स्थितीत असलेले दुध शितकरण केंद्र चे पाठीमागील बाजूस सुरक्षित ठिकाणी 13.00 वा चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर इनामदार मॅडम यांनी तक्रारदार यांना संपर्क करून आमचेकडील वाहनाचे वर्णन सांगून आम्ही थांबलो त्याठिकाणी येणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री.महिबुब सय्यद हे त्यांचेकडील हुंडाई क्रेटा वाहन क्र.एमएच-12-आरटी-5130 मधून आमचे समक्ष हजर झाले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सय्यद यांना आमचेकडील वाहनात बसणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे आमचेकडील वाहनामध्ये बसले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सय्यद यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. नितीन राजेंद्र कांबळे यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री.अशोक किसन कुंभार यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.

त्यानंतर तक्रारदार श्री. सय्यद यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांनी मजूर संस्थेमार्फत घेतलेले जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत जिल्हा परिषद शाळातील वर्ग खोल्या बांधकाम व दुरूस्ती बिलाचे मोजमाप नोंदवही (एम.बी.बुक) तयार करून बिल मंजुरीसाठी पुढे पाठविण्यासाठी तक्रारदार यांचेकडे एकुण बिलाचे 2 टक्के प्रमाणे लाचेची मागणी केली आहे वगैरे हकीकत सांगीतले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सय्यद यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज



Scanned with OKEN Scanner

देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. सय्यद यांनी त्यांचा हस्तलिखीत लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला.

सदर तक्रारी अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये "मी धावडवाडी ता.जत जि.सांगली येथे माझे कुटुंबासह एकत्रात राहणेस आहे. मी 1) पांडुरंग मजुर सहकारी संस्था मर्यादित जत तालुका जत जिल्हा सांगली व 2) भैरवनाथ मजुर सहकारी संस्था मर्यादित कोळीगीरी तालुका जत जिल्हा सांगली या दोन मजुर सहकारी संस्थांना मिळणारे शासकीय काम या संस्थेकडून अधिकार पत्र घेवून प्रत्यक्ष मी काम करीत असतो.

जिल्हा परिषद शाळा उंटवाडी तालुका जत जिल्हा सांगली येथील 2 वर्ग खोल्या बांधकाम करणेचे काम सन 2024-2025 मध्ये कार्यारंभ आदेश जा. क्र. प्रा. शि./निविदा/का.आ./41/24 दिनांक 20/08/2024 निविदा करारपत्र क्रमांक ब-1/41/2024-2025 अन्वये 23,09,339/-रूपये रक्कमेचे पांडुरंग मजुर सहकारी संस्था मर्यादित तालुका जत जिल्हा सांगली यांना मंजुर झालेले आहे. त्यापैकी केले कामाचे बिल रक्कम 15,78,786/- रूपये मला मिळाली आहे. उर्वरित 7,30,553/- रूपयांचे बिल येणे बाकी आहे. तसेच जिल्हा परिषद शाळा वायफळ तालुका जत जिल्हा सांगली येथील 4 वर्ग खोल्याची दुरूस्ती करणेचे काम सन 2025-2026 मध्ये कार्यारंभ आदेश जा. क्र. प्रा. शि./निविदा/का.आ./40/25 दिनांक 15/07/2025 निविदा करारपत्र क्रमांक ब-1/40/2025-2026 अन्वये 20,37,895/- रूपयेचे मंजुर आहेत.

वरील दोन्ही मजुर सहकारी संस्थाना मिळालेली कामे सदर संस्था चेअरमन यांनी मला नोटराईज्ड अधिकार पत्राने पुढील प्रत्यक्ष काम करणेसाठी दिलेली आहेत. सदरची दोन्ही कामे पुर्ण झालेनंतर मी पंचायत समिती जत येथील श्री. संजय सुतार, कनिष्ठ अभियंता, समग्र शिक्षण अभियान, जत पंचायत समिती यांना बिल एम. बी. रेकॉर्ड मोजमाप करून देणेसाठी वारंवर ऑगस्ट 2025 पासुन भेट घेत होतो. परंतु संजय सुतार हे माझे एम. बी. रेकॉर्ड मोजमाप करणेचे कामात टाळाटाळ करत आहेत व अद्याप काम केलेले नाही. आज रोजी सकाळी 10 वाजणेचे सुमारास बिल लवकर मिळवुन देणेसाठी मी भेट घेणेस गेलो असता त्यांनी एकुण बिलाच्या 2 टक्के प्रमाणे स्वत: करीता त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली आहे. 2 टक्के प्रमाणे माझ्या अंदाजाप्रमाणे 70 ते 80 हजार रूपये होतील.

माझे एम. बी. प्रमाणे मोजमाप करून देणेचे काम श्री. संजय सुतार हे त्यांना पैसे दिलेशिवाय पुर्ण करणार नाहीत याची मला खात्री झाली आहे. मला श्री. संजय सुतार, कनिष्ठ अभियंता, समग्र शिक्षण अभियान, पंचायत समिती जत यांना लाच देण्याची इच्छा नाही. मी श्री. संजय सुतार यांना माझे एम. बी. मोजमाप करणेचे कामासंदर्भात पुन्हा भेट घेण्यासाठी गेलो तर ते लाचेची मागणी करणार याची मला खात्री आहे.

माझ्या एम. बी. मोजमापाचे कामासंदर्भातील दोन्ही कामांचे अधिकार पत्र व वर्क ऑर्डरची छायांकीत प्रत यासोबत सादर करीत आहे.

माझा श्री. संजय सुतार, कनिष्ठ अभियंता, समग्र शिक्षण अभियान, पंचायत समिती जत यांचेशी कोणताही उसनवारीचा व्यवहार नाही तसेच आमचेत कोणताही भांडण तंटा नाही. तरी त्यांचेवर कारवाई व्हावी ही विंनती." अशी हकीकत अर्जामध्ये नमूद आहे.

त्यानंतर मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. सय्यद यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करून लोकसेवक श्री. सुतार, कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती जत यांचेविरूध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही 15.16 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये फाईल क्रमांक आरईसी 001 ही सेव्ह असल्याच्या खात्री करून दिल्या.

त्यावेळी तक्रारदार श्री.सय्यद यांनी 15.33 वा चे सुमारास त्यांचे मोबाईल क्र.7499908933 या नंबरवर लोकसेवक श्री.सुतार यांचे मो.क्र. 9579585084 या नंबवरून फोन येत असलेचे आम्हास पंचांसमक्ष सांगितले. त्यावेळी मी दिले सुचनेप्रमाणे तक्रारदार श्री.सय्यद यांनी श्री.सुतार यांचा फोन स्विकारून फोन लाउड स्पिकरवर ठेवला. लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.33 वाजता सुरू करून तक्रारदार श्री.सय्यद यांचेसमोर धरला. त्यावेळी लोकसेवक श्री.सुतार व तक्रारदार यांचेमध्ये बिला संदर्भात चर्चा झाली. त्यावेळी सुतार यांनी तक्रारदार यांना बिल घेवून बोलविल्याने तक्रारदार यांनी 5 मिनीटामध्ये येत असलेचे सांगून फोन कट केला. लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील फोनवरील पडताळणी वेळी तक्रारदार श्री. सय्यद व लोकसेवक श्री. सुतार, कनिष्ठ अभियंता यांचे संभाषणातील फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची मी दोन्ही पंचांना खात्री करुन दिली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सय्यद व पंच क्र.1 नितीन कांबळे यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या. मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.38 वाजता सुरु करुन तक्रारदार गायकवाड यांचे गळयामध्ये लेसच्या सहाय्याने अडकवून तक्रारदार श्री. सय्यद व पंच नं.1 श्री. कांबळे यांना पंचायत समिती जत येथे लोकसेवक श्री. सुतार यांची भेट घेणेकरीता रवाना होणे बाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार व पंच नं.1 कांबळे असे तक्रारदार यांचेकडील हुंडाई क्रेटा वाहन क्र.एमएच-12-आरटी-5130 मधून रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. सय्यद व पंच नं.1 कांबळे असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 16.19 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.

त्यानंतर मी, पंच नं'1 श्री.कांबळे यांना, सुतार यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील कार मधून रवाना होवून पंचायत समिती कार्यालय जत येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार व मी असे कार पार्क करून पंचायत समिती कार्यालय जत येथे पहिल्या मजल्यावरील शिक्षण विभाग येथ दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी तेथील कर्मचारी यांना सुतार यांचेबाबत विचारणा केली असता ते बाहेर गेले असलेचे समजले. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक सुतार यांना फोन करून फोन स्पिकर मोडवर ठेवला. त्यावेळी तक्रारदार व सुतार यांचेमध्ये बिला संदर्भात चर्चा झाली. त्यावेळी तक्रारदार यांनी सुतार यांना ते ऑफीसमध्ये आले असल्याचे सांगून त्यांचेकडे येत असल्याचे सांगितले. त्यानंतर पंचायत कार्यालयाचे गेटजवळ तक्रारदार यांनी एका अनोळखी इसमाची भेट घेवून त्यांचेशी कामा संदर्भात चर्चा करू लागले. त्यावेळी त्यांचेतील बोलवेणवरून अनोळखी इसम हे लोकसेवक सुतार असल्याची माझी खात्री झाली. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक सुतार हे पंचायत समिती कार्यालयाचे समोर असले विस्तार अधिकारी निवासस्थानचे आवारात जावून त्यांचे बिला संदर्भात चर्चा करू लागले. त्यावेळी मी देखील त्यांचे सोबत गेलो.

त्यावेळी लोकसेवक सुतार यांनी तक्रारदार यांचेकडील कागदपत्रांची तपासणी केली. तसेच लोकसेवक सुतार व तक्रारदार यांचेमध्ये उंटवाडी चे 7,50,000/- रूपये, वायफळ चे 20,00,000/- रूपये व काशलिंगवाडी चे 11,81,000/- रूपये असे एकुण 39,31,000/- रूपये बिंलाचे कामा संदर्भात चर्चा झाली. त्यावेळी लोकसेवक सुतार यांनी त्यांचेकडील मोबाईल बिल रक्कमेचे कॅलक्युलेशन करून 2 टक्के प्रमाणे तक्रारदार यांचेकडे "अष्ठाहत्तर हजार" असे म्हणून लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना वाढीव बिलाबाबत विचारणा केली असता सुतार यांनी "दहा द्या की त्यातल" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "तुम्हाला एकुण किती द्यायल लागतय" असे विचारले असता लोकसेवक सुतार यांनी "अष्ट¬ात्तर आणी दहा.... अठ¬ाएेंशी" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "अठ¬ाएेंशी हजार" असे विचारले असता सुतार यांनी "ह" असे म्हणाले. लोकसेवक सुतार यांना तात्काळ सांगली येथे परत जायचे असल्याने तक्रारदार यांनी उद्या सकाळ पर्यंत तुम्हाला पोहच करतो असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व मी तेथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.1 कांबळे यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सय्यद यांना पडताळणी कारवाईची हकिकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं. 1 यांचे हकिकत प्रमाणे हकिकत सांगून आणखीन हकीकत सांगितली की, "काशिलींगवाडी गावातील जिल्हा परिषद शाळांचे 2 वर्ग खोल्या दुरुस्ती हे काम श्रीकृष्ण मजूर सहकारी सोसायटी लि. पाच्छापूर ता.जत जि.सांगली यांचे नावे कार्यारंभ आदेश मिळाला होता. सदरचे काम मी केले असल्याचे सुतार यांना माहित असल्याने त्यांनी स्वत: हिशोब करताना 1) उंटवाडी चे 7,50,000/- रूपये, 2) वायफळ चे 20,00,000/- रूपये व 3) काशलिंगवाडी चे 11,81,000/- रूपये असे एकुण 39,31,000/- रूपये बिंलाचे 2 टक्के प्रमाणे 78,000/- रूपयांची व 10,000 /- रूपये ज्यादा बिलाचे असे एकुण 88,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याची हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. सय्यद व लोकसेवक श्री.सुतार, कनिष्ठ अभियंता यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 003 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाई मध्ये, लोकसेवक श्री.सुतार, कनिष्ठ अभियंता यांनी तक्रारदार यांचे मजूर संस्थेमार्फत जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत जिल्हा परिषद शाळा 1) उंटवाडी चे 7,50,000/- रूपये सुमारे, 2) वायफळ चे 20,00,000/- रूपये सुमारे व 3) काशलिंगवाडी चे 11,81,000/- रूपये सुमारे असे एकुण 39,31,000/- रूपये गावातील शाळांचे वर्ग खोल्या बांधकाम व दुरुस्ती बिलाचे मोजमाप नोंदवही (एम.बी.बुक) तयार करून बिल



Scanned with OKEN Scanner

मंजुरीसाठी कार्यकारी अभियंता, सर्व शिक्षा अभियान, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सांगली येथे पाठविण्यासाठी एकुण 3 बिलाचे 39,31,000/- मंजूर रक्कमेपैकी 2 टक्के प्रमाणे राऊंड फिगर रक्कम 78,000/- रूपये व 10,000/- रूपये ज्यादा बिलाचे असे एकुण 88,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. तसेच सुतार यांनी तक्रारदार यांना दि. 25.02.2026 रोजी सकाळी 09.30 वा पर्यंत पंचायत समिती जत येथे येण्यास सांगतल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेवक श्री.सुतार, कनिष्ठ अभियंता यांचेविरूध्द दि.25.02.2026 रोजी सकाळी 09.30 वा चे सुमारास सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले. मी तक्रारदार श्री.सय्यद यांना दि. 25.02.2026 रोजी सकाळी 08.00 वा चे सुमारास लोकसेवक सुतार यांनी मागणी केलेप्रमाणे लाच रक्कम घेवून जत येथील शासकीय बंद स्थितीत असलेले दुध शितकरण केंद्रचे पाठीमागील बाजूस हजर राहणेच्या व झाले कारवाईबाबत गोपनियता राखणेच्या सुचना दिल्या.

त्यानंतर दि.24.02.2026 रोजीची पडताळणी कारवाई बाबतचा सविस्तर पंचानामा त्याच दिवशी दोन्ही पंचासमक्ष एसीबी कार्यालय, सांगली येथे पुर्ण करण्यात आला. व दि. 24.02.2026 रोजी वापरण्यात आलेले मेमरीकार्ड दोन्ही पंचासमक्ष सिलबद करण्यात आले आहे. तसेच मी दोन्ही पंचांना दि.25.02.2026 रोजी सकाळी 06.00 वाजता विश्रामबाग चौक येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या.

दि. 25.02.2026 रोजी मी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच विश्रामबाग चौक येथे आमचे समक्ष 06.15 वा चे सुमारास हजर झाले.

त्यानंतर मी, पोलीस उप अधीक्षक, यास्मीन इनामदार, दोन्ही पंच, श्रेणी पोउनि/पोपट पाटील, पोना/प्रितम चौगुले, पोकॉ/अजित पाटील व चालक रजपूत असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, मेमरी कार्ड, दि. 24.02.2026 रोजीचे पडताळणी कारवाईचे सर्व कागदपत्रे, लॅपटॉप, पिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अॅथ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं. एमएच-10-डीक्यु-9530 मधून विश्रामबाग चौक येथून 06.25 वाजता रवाना होवून विश्रामबाग चौक, माधवनगर, बुधगाव, कुमठेफाटा मार्गे, शिरढोण, सोलापूर हायवे मार्गे, नागज, जत येथे शासकीय दुध शितकरण केंद्र चे पाठीमागील बाजूस 08.00 वा चे सुमारास दाखल झालो.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.सय्यद यांना संपर्क करून आम्ही थांबलो त्याठिकाणी येणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री.सय्यद हे काही वेळाने त्यांचेकडील हुंडाई क्रेटा वाहन क्र.एमएच-12-आरटी-5130 मधून आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार श्री. सय्यद यांना आमचेकडील वाहनात बसणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे आमचेकडील वाहनामध्ये बसले.

त्यानंतर आम्ही श्री. सुतार, कनिष्ठ अभियंता यांचेविरूध्द पंचायत समिती जत येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. त्यानंतर मी तक्रारदार श्री. सय्यद यांना लोकसेवक श्री.सुतार यांनी मागणी केलेली 88,000/- रूपये हजर करण्यास सांगितले.

त्यावेळी तक्रारदार श्री. सय्यद यांनी त्यांचेकडील 500/- रूपये दराचे 176 नोटा असे एकुण 88,000/- रूपये आमचे व दोन्ही पंचासमक्ष हजर केले. त्यानंतर मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी तक्रारदार यांनी हजर केलेली 88,000/- रूपये रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर मी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार श्रेणी पोउनि पाटील यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटांचा बंडल तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे खिश्यामध्ये ठेवला व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.

त्यानंतर आम्ही 08.38 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे सापळा कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये फाईल क्रमांक आरईसी 001 ही सेव्ह असल्याच्या खात्री करून दिल्या.

त्यानंतर आम्ही लोकसेवक श्री.सुतार यांचा तक्रारदार यांना काही वेळ फोन येण्याची वाट पाहिली परंतू लोकसेवक सुतार यांचा फोन न आल्याने तक्रारदार व पंच नं.1 कांबळे यांना लोकसेवक सुतार यांचेकडे पंचायत समिती जत



Scanned with OKEN Scanner

येथे पाठवून सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सय्यद दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच पथकातील अंमलदार श्रेणी पोउनि पाटील यांना शासकीय दुध शितकरण केंद्रचे पाठीमागील बाजूस थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले. तसेच मी पथकातील अंमलदार पोकॉ/पाटील यांना त्यांचेकडील हॅन्डीकॅममध्ये लोकसेवक यांचेकडून लाच रक्कम जप्तीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.

तसेच मी तक्रारदार यांना लोकसेवक श्री. सुतार यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 09.29 वाजता सुरू करून लेसव्दारे तक्रारदार यांचे गळयामध्ये अडकवून श्री. सुतार यांची त्यांचे कार्यालयात भेट घेण्याकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. सय्यद व पंच नं. 1 श्री. कांबळे असे तक्रारदार यांचेकडील हुंडाई क्रेटा वाहन क्र.एमएच-12-आरटी-5130 मधून रवाना झालेत.

त्यांचे पाठोपाठ मी, इनामदार मॅडम, पंच नं. 2 श्री. कुंभार, पोना/प्रितम चौगुले, पोशि/अजित पाटील व चालक रजपूत असे लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, काळे रंगाचे कापड व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं. एमएच-10-डीक्यु-9530 मधून रवाना झालो. श्रेणी पोउनि पाटील हे शासकीय दुध शितकरण केंद्रचे पाठीमागील बाजूस सुटकेससह थांबून राहिले.

तक्रारदार व पंच नं.1 असे जत शहरातून पंचायत समिती जत कार्यालयचे समोर रोडकडेला कार पार्क केली. लागलीच मी दिले सुचनेप्रमाणे चालक रजपूत यांनी आमचेकडील वाहन तक्रारदार यांचेकडील वाहनापासून काही अंतरावर थांबवली. त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 कांबळे असे कारमधून खाली उतरून पंचायत समिती कार्यालयामध्ये चालत गेलेचे दिसले. लागलीच मी, पंच नं.2 कुंभार, इनामदार मॅडम व अंमलदार चौगुले व पाटील असे आमचेकडील वाहनामधून खाली उतरून पंचायत समिती कार्यालयाचे आजुबाजूस सापळा लावून थांबून राहिलो.

काही वेळाने तक्रारदार व एक अनोळखी इसम व त्यांचे सोबत पंच नं.1 कांबळे हे पंचायत समिती कार्यालयाचे पहिल्या मजल्यावरून खाली आले. व तक्रारदार व पंच नं.1 कांबळे हे पंचायत समिती कार्यालया समोर असले झेरॉक्स सेंटरमध्ये गेले. व सदर अनोळखी इसम हा कार्यालयाचे समोरील बाजूस असले विस्तार अधिकारी निवासस्थानचे समोरील मोकळे जागेत वाहन पार्क केलेल्या ठिकाणी गेलेचे दिसले.

त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 कांबळे असे तेथून विस्तार अधिकारी निवासस्थानचे समोरील मोकळे जागेत जावून तक्रारदार व अनोळखी इसम चर्चा करीत असलेचे दिसले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री.सय्यद यांनी त्यांचे खिश्यातील हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला.

लागलीच मी व सापळा पथक असे तक्रारदार, अनोळखी इसम व पंच नं.1 कांबळे हे थांबले ठिकाणी गेलो. त्यावेळी मी दिले सुचनेप्रमाणे पोकॉ/पाटील यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 09.58 वा काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला व तक्रारदार यांना बाजूला जावून थांबण्या बाबत सुचना दिल्या. त्यावेळी तेथे हजर असले पंच नं.1 कांबळे यांनी त्यांचे समोरील इसम हे लोकसेवक सुतार असल्याचे सांगून त्यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम उजवे हाताने स्विकारून त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी व पोना चौगुले यांनी लोकसेवक सुतार यांचे हात मनगटाजवळ घट्ट पकडले. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पोशि/अजित पाटील यांनी त्यांचेजवळील हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ शुटींग सुरु केले. त्यावेळी मी सुतार यांना माझी ओळख सांगितली. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पंच नं.2 कुंभार यांनी लोकसेवक श्री.सुतार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्याची तपासणी केली असता खिश्यामध्ये 500/- रूपये दराच्या नोटांचा बंडल मिळून आला.

त्यानंतर पंच नं.2 कुंभार यांनी सदर 500/- रूपये दराच्या नोटांचे नंबरची पडताळणी केली असता सदर नोटांचे क्रमांक हे तक्रारदार यांनी सापळापुर्व कारवाईवेळी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाचेच असलेचे निष्पन्न झाले. सदर लाचेची रक्कम पंच नं 2 श्री. कुंभार यांना त्यांचेकडे ठेवण्यास सांगीतली त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडे ठेवली. त्यानंतर आम्ही लोकसेवक श्री.सुतार यांना आमचेकडील शासकीय वाहनामध्ये बसवून जरूर तो अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात त्यांचे हातांची, कपडयांची तपासणी केली असता सुतार यांचे उजवे हातांचे बोटास व पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यास ठिक-ठिकाणी अॅथ्रॉसिन पावडर लागलेची निळसर चकाकी



Scanned with OKEN Scanner

दिसून आली. सदर कार्यवाहीचे पोकॉ/पाटील यांनी सलग त्यांचेकडील सोनी हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ चित्रीकरण केले आहे.

त्यानंतर मी लोकसेवक श्री. सुतार यांना माझी, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर मी श्री.सुतार यांना त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. संजय भगवान सुतार, वय - 51 वर्षे, व्यवसाय - कनिष्ठ अभियंता (कंत्राटी), सर्व शिक्षा अभियान, शिक्षण विभाग पंचायत समिती जत रा. शिवशंकर थिएटरजवळ, मिरज, ता.मिरज जि.सांगली असे असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही व सापळा पथक असे श्री. संजय सुतार, कनिष्ठ अभियंता यांना ताबेत घेवून आमचेकडील शासकीय वाहनाने घेवून पंचायत समिती जत कार्यालयातील पहिल्या मजल्यावरील शिक्षण विभाग येथे गेलो. त्यानंतर आम्ही तेथील लोकसेवक बसत असले टेबलची व कार्यालयातील कागदपत्रांची तपासणी केली. त्यावेळी तक्रारदार यांचे बिलाचे अनुषंगाने इतर कोणताही कागदपत्रे मिळाली नाहीत.

त्यानंतर आम्ही गोपनीयतेच्या दृष्टीने व कारवाईच्या सोईकरीता पंचायत समितीचे शासकीय विश्रामगृह येथे जाणेचे निश्चित केले. मी तक्रारदार यांना पंचायत समितीचे शासकीय विश्रामगृह येथे जाणेस सांगितले. त्यानंतर आम्ही श्री. संजय सुतार यांना ताबेत घेवून पंचायत समिती कार्यालय जत येथून 10.50 वा चे सुमारास रवाना होवून 11.00 वा पंचायत समिती शासकीय विश्रामगृह जत येथे दाखल झालो.

त्यानंतर मी पंच नं.1 श्री. कांबळे यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगण्यास सांगितली असता पंच नं. 1 यांनी सापळ्याची हकीकत सांगितली की, "मी व तक्रारदार असे त्यांचेकडील कार मधून रवाना होवून पंचायत समिती कार्यालय जत येथे दाखल झालो. आम्ही कार रोडकडेला पार्क करून कार्यालयाचे पहिल्या मजल्यवरील शिक्षण विभाग येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार सय्यद यांनी सुतार यांची भेट घेवून त्यांचेशी त्यांचे बिला संदर्भात चर्चा केली.

त्यानंतर तक्रारदार सय्यद व लोकसेवक सुतार असे कार्यालयातून खाली चालत गेले. लागलीच मी देखील त्यांचे सोबत गेलो. त्यावेळी तक्रारदार व मी असे पंचायत समिती कार्यालयाचे समोरील झेरॉक्स सेंटर येथे गेलो. व लोकसेवक सुतार हे बाजूस असले विस्तार अधिकारी निवासस्थानचे समोरील मोकळे जागेमध्ये गेले. त्यानंतर तक्रारदार व मी विस्तार अधिकारी निवासस्थानचे समोरील मोकळे जागेमध्ये एका कारचे बाजूस थांबलो व लोकसेवक सुतार यांची भेट घेतली. त्यावेळी लोकसेवक सुतार यांनी तक्रारदार यांना त्यांचे एम.बी. बिलाची फाईल व कागदपत्रे दिली.

त्यावेळी लोकसेवक सुतार यांनी हाताने इशारा करून लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजूचे खिश्यामध्ये ठेवली लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने बाहेर काढून लोकसेवक सुतार यांचेसमोर धरून "हे घ्या.....पैसे मापून घेता का बघा" असे म्हणाले. त्यावेळी लोकसेवक सुतार यांनी "ह...नको" असे म्हणून रक्कम मोजण्यास नकार देवून लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून ती त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजूचे खिश्यामध्ये ठेवली. त्यावर तक्रारदार यांनी "अठ्याहत्तर हजार आपले ठरलेल.....आणि दहा हजार तुम्हाला एक्स्ट्रा दिलेल पैसे" असे म्हणाले. त्यावर सुतार यांनी "होय, बरोबर हाय की" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचेकडील हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. लागलीच आपण व सापळा पथक असे आमचेजवळ आला" वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सय्यद यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली असता त्यांनी पंच नं.1 कांबळे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील कार्यवाही पंचायत समिती जत चे शासकीय विश्रामगृह येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 24/02/2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान, लोकसेवक श्री.सुतार, कनिष्ठ अभियंता यांनी तक्रारदार यांचे मजूर संस्थेमार्फत जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत जिल्हा परिषद शाळा 1) उंटवाडी चे 7,50,000/- रूपये सुमारे, 2) वायफळ चे 20,00,000/- रूपये सुमारे व 3) काशलिंगवाडी चे 11,81,000/- रूपये सुमारे असे एकुण 39,31,000/- रूपये गावातील शाळांचे वर्ग खोल्या बांधकाम व दुरूस्ती बिलाचे मोजमाप नोंदवही (एम.बी.बुक) तयार करून बिल मंजुरीसाठी कार्यकारी अभियंता, सर्व शिक्षा अभियान, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सांगली येथे पाठविण्यासाठी एकुण 3 बिलाचे 39,31,000/- मंजूर रक्कमेपैकी 2 टक्के प्रमाणे राऊंड फिगर रक्कम 78,000/- रूपये व 10,000/- रूपये ज्यादा बिलाचे असे एकुण 88,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि. 25/02/2026 रोजीचे सापळा कारवाईवेळी श्री. संजय भगवान सुतार, वय - 51 वर्षे, व्यवसाय - कनिष्ठ अभियंता (कंत्राटी), सर्व शिक्षा अभियान, शिक्षण विभाग पंचायत समिती जत यांनी विस्तार अधिकारी निवास्थात पंचायत समिती जत आवारात आपले स्वत:चे पदाचा गैरवापर करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक



Scanned with OKEN Scanner

फायद्याकरीता तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करुन लाच रक्कम 88,000/- रूपये स्विकारुन स्वत:चा आर्थिक फायदा मिळविला आहे.

म्हणुन माझी लोकसेवक श्री. संजय भगवान सुतार, वय - 51 वर्षे, व्यवसाय - कनिष्ठ अभियंता (कंत्राटी), सर्व शिक्षा अभियान, शिक्षण विभाग पंचायत समिती जत रा. शिवशंकर थिएटरजवळ, मिरज, ता.मिरज जि.सांगली यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंटआऊट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANDEEP RANGRAO KOLEKAR(I (Inspector)) / PNMH53637, **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SANDEEP RANGRAC
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PNMH53637

ठाणे अंमलदार
जत पोलीस ठाणे



Scanned with OKEN Scanner